# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१७/ 3136

दिनांक : 16 OCT 2017

प्रति,
संबंधीत शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिताचा शुल्काचा तपशिल अद्यावत करणे व प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना योजनांची माहिती देणेबाबत..........

संदर्भ : १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१७/१८१६, दि. २०/०६/२०१७
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टीईएम-२१६/प्र.क्र.५५९/ तांशि-४, दि. ११/०८/२०१७
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-ईबीसी/२०१७/१६०, दि. २६/०९/२०१७

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** व **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनांची"** माहिती होण्याच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाकडून बॅनर्स उपलब्ध करुन देण्यांत आलेले होते. सदर बॅनर्स ज्या संस्थांमध्ये एआरसी व एफसी आहेत. अशा संस्थांना देण्यांत आलेले आहेत.

संस्थांना वाटप करण्यांत आलेल्या बॅनर्समधील पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा या बाबीखालील ब) मध्ये नमूद केल्यानुसार "रु. २.५० लाखापेक्षा अधिक ते रु. ६.०० लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी/बारावी) गुण ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक." ही अट संदर्भीय क्र. २च्या शासननिर्णयान्वये शिथील करण्यांत आली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सर्व संबंधीत संस्थांच्या माहितीसाठी सोबत जोडण्यांत येत आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संदर्भीय क्र.३च्या पत्रानुसार सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यांत येते की, संस्थांस्तरावर सूचनापत्रक निर्गमीत करुन सर्व ईबीसी सवलतपात्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास ही बाब आणून द्यावी.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

सहपत्रे : वरीलप्रमाणे

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता निश्चित करण्यात आलेली किमान गुणवत्तेची अट शिथिल करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :-टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: ११ ऑगस्ट, २०१७

संदर्भ: १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/ प्र.क्र.२१९/ तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५/०४/२०१७
४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक २१/०६/२०१७

**प्रस्तावना :**

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये पदविका व पदवी अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांकरीता पात्रतेसाठी अनुक्रमे इयत्ता १० वी / इयत्ता १२ वी मध्ये किमान ६० टक्के गुणांची अट घालण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये या योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पात्रतेकरीता ६० टक्के गुणांची अट शिथिल करण्यात आली आहे.

तसेच पदविकाधारक जे विद्यार्थी थेट व्दितीय वर्षाच्या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी पदविका अभ्यासक्रमांच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुणांऐवजी ५० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक असल्याची अट निर्धारीत केली आहे. या प्रवर्गातील उर्वरित अन्य विद्यार्थ्यांकरीता या योजनेंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी किमान ६० टक्के गुणांची अट अद्यापही कायम आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सर्व विद्यार्थ्यांकरीता या योजनेंतर्गत

लाभाच्या पात्रतेसाठी सध्या निर्धारित केलेली किमान ६० टक्के गुणांची अट शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सर्व विद्यार्थ्यांसाठी योजनेच्या लाभाकरीता पात्रतेसाठी निर्धारीत केलेली किमान ६० टक्के गुणांची अट ही शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शिथिल करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. यानुसार संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय व संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांनी याची नोंद घ्यावी. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता सदर शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी करावी.

२. सदर योजनेंतर्गत कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय आणि वैद्यकीय शिक्षण औषधीद्रव्ये या विभागांच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी लाभाच्या पात्रतेसाठी किमान ६० टक्के गुणांची विहित केलेली अट शिथिल करण्याबाबतचे आदेश या विभागांनी त्यांच्या स्तरावर तात्काळ निर्गमित करावेत.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक, ८२१/व्यय-५, दिनांक ९/८/२०१७ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धकरुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०८१११३०१३७०२०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dr.Kiran Patil Digitally signed by Dr.Kiran Patil Date: 2017.08.11 15:23:08 +05'30'

( डॉ. किरण पाटील )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव (प.दु.म.), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सामाजिक न्याय व विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

९. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
११. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे,
१२. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक
१३. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१४. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१५. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१६. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
२४. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२६. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२७. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२९. सर्व जिल्हाधिकारी
३०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३१. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३५. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
३६. उप सचिव (मशि/विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३७. अवर सचिव (तांशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३८. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/ तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
४०. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
४१. निवडनस्ती/तांशि-४